प्रकरण एक

# प्रास्ताविक

# प्रकरण १ ले

## प्रास्ताविक


| | | पृष्ठांक |
|---|---|---|
| १.१ | विषय प्रवेश | 1 |
| १.२ | संशोधन समस्येचे शीर्षांकन | 4 |
| १.३ | संशोधन विषयाचे स्वरूप, महत्व व व्याप्ती | 6 |
| १.४.१ | संशोधनाची उद्दिष्टे | 12 |
| १.४.२ | गृहित गोष्टी | 13 |
| १.५ | संशोधनाच्या मर्यादा | 13 |
| १.६. | संशोधन पद्धती | 14 |
| १.७ | प्रकरणीकरण | 18 |

## १.१ विषय प्रवेश :

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये प्रामुख्याने दोन सामाजिक जाणीवा व गरजा लक्षात घेतलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

१) राष्ट्रीय वृत्ती व राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व यांची वाढ करणे.
२) भारतीय घटनेत नमूद केलेल्या व्यक्तिगत व सामाजिक उद्दिष्टांच्या परिपूर्तीवर व मूल्यांच्या प्रसारावर भर देणे.[१]

वरील दोन सामाजिक जाणीवा व गरजांपैकी 'मूल्यांच्या प्रसारावर भर देणे' या जाणीवेवर लक्ष केंद्रित होण्यास सध्य परिस्थितीमध्ये मूल्यांचा होणारा ऱ्हास कारणीभूत झाला.

शिक्षित माणूस सुसंस्कृत असतो असे तात्त्विकरित्या सांगता येईनासे झाले आहे. Knowledge is virtue असे म्हटले जाते. पण प्रत्यक्षात त्याचा प्रत्यय क्वचितच येत असलेला दिसतो. व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे सर्वमान्य ध्येय गृहित धरले तर या ध्येयाची परिपूर्ती आजची शिक्षणपद्धती करू शकलेली नाही असे सर्वसाधारण चित्र दिसते.

महात्मा गांधींनी शिक्षणाची व्याख्या करताना असे म्हटले आहे,

> "By education I mean, an all round drawing of the best in child and man - body, mind and spirit."[2]

पण स्मरणावर आधारित असणाऱ्या पदव्यांचा स्वीकार करण्यात बहुतांशी बुध्दिवादी मंडळी मूल्ये हरवून बसलेली दिसतात. उच्च विद्याविभूषित युवक राष्ट्राबाबत बेफिकीर वृत्तीने वागणारा, वडीलधाऱ्यांचा उघडी अपमान करणारा, निषिध्द असणाऱ्या सर्व विचारांचा आणि कृतींचा स्वार्थासाठी स्वीकार करणारा असल्याचे सर्वसाधारण चित्र सर्वाकडे दिसत आहे.

शरीर, मन आणि आत्मा यांचा संतुलित विकास साधण्यासाठी आजची शिक्षण पध्दती अपयशी होत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. बहुतांशी उच्च विद्याविभूषित लोक स्वत:वरील विश्वास हरवून बसल्याचे दिसत आहे. मनशांतीविना भौतिक प्रगतीचे अत्युच्च शिखर त्याने गाठले आहे. व्यक्तिगत चारित्र्य संपन्नतेबाबी ती केवळ ` पाहिलेचे कोठार ` बनलेला आहे. व्यावसायिक पात्रता प्राप्त करून घेताना ती सामाजिक बांधीलकी विसरलेला असल्याचे दिसत आहे.

मूल्यसंक्रमणाच्या अभावामुळे माणसामध्ये निर्माण झालेली ही विकृती मानवी विनाशालाच कारणीभूत होणार आहे. म्हणूनच मूल्य शिक्षणाला या विज्ञानयुगामध्ये अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये (१९८६), नागरिकामध्ये सामाजिक व नैतिक मूल्यांचे संक्रमण राष्ट्र उभारणीसाठी किती आवश्यक आहे याचे विश्लेषण करताना धर्मांधता, जातीयता, व्यक्तिवाद यामुळे भारतामध्ये किती भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे याचे विस्तृत विवेचन केले आहे. तसेच भारताला आपल्या परंपरेवर आधारित, राष्ट्रीय उद्दिष्टांवर आधारित मूल्य शिक्षणाची किती गरज आहे याचा निर्देश केला आहे.

8.4 "The growing concern over the erosion of essential values and increasing cynicism in society has brought to focus the need for readjustments in the

curriculam in order to make education a forceful tool for the cultivation of social and moral values.

8.5 In our culturally plural society, education should faster universal and enternal values oriented towards the unity and integration of our people. Such value education should help eliminate obscurantism, religious fanticism, violence, superstition and fatalism.

8.6 Apart from this combative role, value education has profound positive content based on our heritage, national goals and universal perception. It should lay primary emphasis on this aspect."[3]

मूल्यसंस्काराच्या संदर्भातील राष्ट्रीय गरज आणि मूल्यसंस्कार संक्रमणाच्या संदर्भात भेडसावणारी तीव्र समस्या लक्षात घेऊन त्या संदर्भात संशोधन करावे अशी भूमिका मनामध्ये दृढ झाली.

या समस्येचा शोध घेताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, संस्कारग्रहण करण्यास योग्य असलेली बाल्यावस्था, किशोरावस्था व कुमारावस्था या अवस्थांमध्येच संस्कारांचे संक्रमण योग्य पध्दतीने होत नसावे.

मातृभाषा विचारांचे सहज सुलभपणे वहन करणारी, भावनांचा परिपोष करणारी आणि व्यक्तिमत्वाचा विकास करणारी भाषा होय. संस्कृती संवर्धन, संरक्षण आणि संक्रमणासाठी मातृभाषेने केलेले कार्य अनन्य-साधारण आहे. कोणत्याही गोष्टी शिकविण्यासाठी मातृभाषा ही अत्यंत महत्वाचे साधन आहे. मूल्यसंवर्धनाच्या संदर्भात मातृभाषेचे महत्व अनन्यसाधारण

आहे. हा विचार करून इयत्ता ९ वी व १० वीच्या मराठी मातृभाषेच्या पाठ्यपुस्तकाच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात विचार करण्याचे ठरविले.

१.२ संशोधन समस्येचे शब्दांकन :

वरील मुद्यांच्या आधारे प्रस्तुत विषयाचे शब्दांकन खाली दिल्या प्रमाणे केले आहे :

" माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास."

संशोधनासाठी शास्त्रीय परिभाषेची आवश्यकता असते. " विषयाच्या शब्दांकना " मधील उपयोजित संज्ञांचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे केले आहे.

माध्यमिक स्तर -

नवीन शैक्षणिक धोरणानुसार अपेक्षित असणाऱ्या माध्यमिक स्तराचा विचार येथे अभिप्रेत आहे. येथे माध्यमिक स्तरावरील म्हणजेच इयत्ता ९ वी व १० वीच्या मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा विचार मूल्यसंदर्भात केलेला आहे.

मराठी पाठ्यपुस्तक -

" पाठ्यपुस्तक " या ऐवजी " क्रमिक पुस्तक " असा पर्यायी शब्द दिला आहे. त्याचा इंग्रजी प्रतिशब्द 'Text-Book' असा आहे. Text-Book चा अर्थ 'A Book for Regular Study.'[4] असा आहे.

<u>पाठ्यपुस्तकाची व्याख्या</u> -

"Basic Book used in a particular course of study."[5]

अशी केलेली आहे. त्याचा अर्थ ' विशिष्ट अभ्यासक्रमासाठी योजलेले मूलभूत पुस्तक ' असा होतो.

त्रिभाषा सूत्रानुसार मातृभाषेची प्रथम भाषा म्हणून शालेय अभ्यासक्रमात नोंद झालेली आहे. महाराष्ट्रात प्रथम भाषा म्हणून मातृभाषा ' मराठी ' शिकविली जाते. मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकांचा विचार करताना येथे प्रथम भाषा म्हणून फक्त महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी इयत्ता ९ वी व १० वी साठी नियुक्त केलेली ' कुमारभारती पुस्तक ९ वे व कुमार भारती पुस्तक १० वे ' ही पाठ्यपुस्तके अभिप्रेत आहेत. त्यांचा मूल्य शिक्षणाच्या संदर्भात विचार अभिप्रेत आहे.

<u>मूल्यशिक्षण</u> -

' मूल्य ' शब्दाला इंग्रजीमध्ये Value असा प्रतिशब्द आहे. या शब्दाचा अर्थ खालीलप्रमाणे आहे :

Belief about what is desirable or undesirable, values reflect the culture of society and if the individual accepts a value for him/herself it may become a goal.[6]

येथे ' मूल्यशिक्षण ' हा शब्द सुसंस्कार या शब्दाच्या अर्थाशी निगडीत आहे. मानवी संस्कृतीतील सद्गुणांनी ' मूल्य ' ही संज्ञा निर्माण केलेली आहे. येथे स्वजीवनाचा, समूहजीवनाचा, सामाजिक व्यवहाराच्या आशा-

आकांक्षेचा विचार व्यक्तीच्या संदर्भात अधिक केला गेला आहे. सामाजिक जीवनात व्यक्तिवर्तन, व्यवहार, जीवन कसे असावे याचे आदर्शीकरण ' मूल्य ' या संज्ञेमध्ये अपेक्षित आहे.

मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकातून व्यक्त होणाऱ्या (उदाहरणार्थ सत्यनिष्ठा, सौंदर्याभिरुची, प्रामाणिकपणा, राष्ट्रनिष्ठा, स्वावलंबन, विनयशीलता) या सारख्या विविध मूल्यांचा शोध घेण्याचा विचार आहे. त्या संदर्भातील समस्यांचा शोध व अध्ययनातील उपाययोजना यांची नोंद या ठिकाणी आपणास करावयाची आहे.

<u>चिकित्सात्मक अभ्यास</u> -

' चिकित्सा ' या संज्ञेत समस्येचे सखोल, सूक्ष्म, अंतर्मुखी निरीक्षण व विश्लेषण अपेक्षित असून ' अभ्यास ' या संज्ञेमध्ये समस्येच्या केलेल्या चिकित्सेच्या आधारावर शिक्षण अपेक्षित आहे.

### १.३ संशोधन विषयाचे स्वरूप, महत्त्व आणि व्याप्ती :

सामाजिक क्षेत्रामध्ये होत असलेला मूल्यांचा ऱ्हास उपरिनिर्दिष्ट समस्येच्या संशोधनासाठी कारण ठरला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षे झाली. भारतातील लोकांच्या मानसिक, आर्थिक, सामाजिक परिस्थितीकडे पाहिले की प्रत्येक ठिकाणी संस्कृतीपोषक मूल्यांचा होत असलेला ऱ्हास पहावयास मिळतो. प्रेयसीसाठी मातेचे काळीज घेऊन जाणारा प्रियकर हा कविकल्पनेतला राहिला नसून आज वास्तवातही पहावयास मिळतो. त्याच्या ठिकाणी आलेली निष्ठुरता, निर्दयता ही विचारवंताला निश्चितच अंतर्मुख केल्याशिवाय राहात नाही. स्वतःची कर्तव्यदक्षता विसरून

स्वार्थासाठी भ्रष्टाचारी बनलेली पिढीही आपण पहात आहोत. चिरंतन सत्याला सामोरे जाण्यासाठी आवश्यक असणारी निर्भयता क्वचित एखाद्याकडे पहावयास मिळते. त्यामुळे सर्वत्र असत्प्रवृत्तींचे साम्राज्य पहावयास मिळते आहे. त्यामुळे सामाजिक राष्ट्रीय स्वास्थ्याला कधी नव्हे ते ग्रहण लागलेले आहे. जीवनात येत असलेले यश-अपयश हे खिलाडूवृत्तीने झेलले पाहिजे, पचविले पाहिजे. पण प्रत्यक्षात यशाने हुरळून जाऊन यशाच्या धुंदीमध्ये ' स्व ' चा नाश करणारी आणि अपयशाने क्रोधित होऊन इतरांचा नाश करणारी पिढी तयार होत असल्याचे आपणास पहावयास मिळते. लोकांच्या जीवनाला बेशिस्तीचे ग्रहण लागल्याचे दिसत आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाला सामोरे न जाता स्वार्थासाठी आंधळ्या भक्तीची कास धरणारे व माणुसकी हरवलेले अनेकजण आपणास पहावयास मिळतात. राष्ट्रप्रेमाची संकल्पना मुळातून भारतीयांमध्ये रुजविली पाहिजे हे पंजाब प्रश्न, सीमावाद, जातीय दंगली, धर्मवेडेपणा यासारख्या गोष्टींनी सिद्ध केल्याचे दिसत आहे. करुणा, सत्कार्य, बंधुता, समता, आदरभाव, राष्ट्रीय एकात्मता, निसर्ग प्रेम यासारखी मूल्ये भारतीयांच्यामध्ये रुजविण्याची गरज आज असल्याचे आपणास पहावयास मिळते आहे.

अशी भयावह अवस्था असताना ही परिस्थिती सावरण्यासाठी लोकांच्यामध्ये मूल्यसंवर्धन व संक्रमण विशिष्ट नियोजनाद्वारे झाले पाहिजे अशी ठाम भूमिका संशोधकाची झाली. शिक्षणाची व्याख्या, ' व्यक्तिमध्ये इष्ट दिशेने बदल घडवून आणणारी प्रक्रिया ' अशी केली जाते. म्हणूनच मूल्य संवर्धन व संक्रमण शिक्षणानेच शक्य आहे या विचाराप्रत संशोधक आला.

शिक्षणानेच मूल्य संवर्धन, संक्रमण शक्य आहे याची निश्चिती झाल्यानंतर संशोधकाने मराठीच्या क्रमिक पुस्तकांच्या अध्यापनाबाबत

मूल्यविचारांच्या संदर्भात विचार केला आहे, कारण " व्यक्तिमत्त्वाच्या वेलीवर उमलणाऱ्या सुंदर सुमनांना मातृभाषा हाच जीवनरस आहे."[७]

" मराठी " मातृभाषेने महाराष्ट्रीय माणसाचे मन घडविले आहे. त्याच्या मनाच्या प्रत्येक पैलूवर मातृभाषेचे ऋण आहे. मातृभाषा ही संस्कृती संवर्धक असते. व्यक्तिमत्त्वामध्ये भावना परिपोष करून त्याला माणूसपण देणारी मातृभाषा ही जीवनदायी असते. तिच्यातून व्यक्त होणारा विचार व्यक्तिमत्त्वात रुजतो किंवा मिसळतो. व्यक्तीच्या आंतरिक क्रिया-प्रतिक्रियांना मातृभाषाच एक विशिष्ट वळण देत असते. व्यक्तिमत्त्व विकासामध्ये मातृभाषा अत्यंत महत्त्वाचे कार्य करीत असते. कोणतीही गोष्ट अंतरंगात व्यक्तिमत्त्वामध्ये संक्रमित करण्यासाठी मातृभाषेसारखे सक्षम व श्रेष्ठ साधन नाही. म्हणून मूल्यविचारांच्या संदर्भात मातृभाषेच्याच क्रमिक पुस्तकांचाच विचार संशोधकाने केला आहे. तसेच " मूल्य विचार " ही संकल्पना अमूर्त आहे. " मूल्य संस्कार " या संकल्पनेचा संबंध व्यक्तिमत्त्वातील स्थिरभावाशी असतो. त्यामुळे अमूर्त असणारी " मूल्यविचार " ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात संस्कारित करून स्थिरभावाशी जोडणे हे जेवढे सहजसाध्य वाटते तेवढे सोपे नाही. " मूल्यविचार " सारखी ही अमूर्त कल्पना वर्गात साक्षात (प्रत्यक्षात) आदानप्रदान करता येत नाही. ती संक्रमित होणे गरजेचे असते. म्हणून अमूर्त असणारे मूल्यविचार संक्रमित करण्यासाठी मूल्यविचारांनी परिपूर्ण असणारे येथे मराठी क्रमिक पुस्तकात असणे गरजेचे असते.

शोध समस्येमध्ये इ. ९ वी व १० वी या वर्गातील मराठी माध्यमाच्या शाळांतील मुलांचा निर्देश येथे अभिप्रेत धरलेला आहे. या वर्गातील मुलांचा वयोगट हा १५ व १६ असा आहे. हा वयोगट पौगंडावस्थेतील मुलांचा

वयोगट आहे. या वयोगटातील मुलांच्या अवस्थेला कौमार्यावस्था असेही म्हणतात. या वयोगटातील मुलांची वैशिष्टे सर्वसाधारणपणे अशी सांगता येतील :

१) कौमार्यावस्था हा मानसिक ताणांचा व भावनिक ताणांचा काळ असतो.
२) या अवस्थेत स्वातंत्र्य प्रिय ठरतो.
३) कुमाराचे वर्तन या अवस्थेत अस्थिर असते.
४) बुध्दी आणि शरीर यांची वाढ झपाट्याने होत असते.
५) स्वयंनिर्णय घेण्याची उत्कट इच्छाशक्ती त्यांच्यामध्ये प्रकटते.
६) परिस्थितीशी समायोजन करणे त्याला अवघड जाते.
७) आत्मसंयम कमी असल्याने भावना तील विफलता.
८) अमूर्त विचार करण्याची व समजून घेण्याची पात्रता त्यांच्यामध्ये येते.
९) या वयात संवेदन, स्मरण, कल्पना, अवधान शक्ती, बुध्दी यांची वाढ झालेली असते.
१०) कुमारवयात अभिरुची विशाल व विविध असतात.
११) वैचारिक जीवनाला निश्चित दिशा मिळावी म्हणून ` कुमार ` आदर्शाच्या शोधात असतो.
१२) या अवस्थेत कुमार भावनाधीन असतो. तो स्वकेंद्री व आत्मकेंद्री बनतो.
१३) चांगल्या वाईटाचा निवाडा तो करु शकतो.
१४) त्याची ` स्व ` ची कल्पना स्पष्ट होत जाते.
१५) पटलेले मत मांडण्याचे धैर्य त्याच्यामध्ये येते.

मूल्य विचाराच्या संदर्भात याच कुमार गटाची संशोधकाने का निवड केली हे समजून येईल. मूल्यविचार ही अमूर्त संकल्पना असल्याने ती समजून घेण्याची

पाहता कुमार गटामध्ये आलेली असते. आदर्शाच्या शोधात असणारा हा वयोगट असल्याने या वयोगटाला मातृभाषेच्या अभ्यासक्रमातून मिळणाऱ्या मूल्यांचा शोध घेण्याचा विचार करण्यात आला आहे. हा काळ वाढत्या अशांततेचा काळ असल्याने या मानसिक अशांततेच्या कालखंडात सद्गुणांची निवड करण्यास त्यांच्यासमोर अधिकाधिक सद्गुणांनी (मूल्यांनी) युक्त असे पाठ अभ्यासक्रमात घेण्याच्या दृष्टीने या वयोगटाची निवड केली आहे.

मूल्यांचा होणारा ऱ्हास, मातृभाषेचे मूल्यशिक्षणातील महत्त्व आणि पौगंडावस्थेतील मुलांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधन विषयाचे स्वरूप पाहिले आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

या संशोधनाचे निष्कर्ष व त्यावर आधारित शिफारशी मूल्यशिक्षणा संदर्भातील प्रचलित परिस्थितीतील समस्यांच्या निराकरणासाठी उपयुक्त ठरतील असा विश्वास वाटतो.

जे.पी. नाईक यांनी म्हटले आहे,

> "Education is essentially a three-fold process; imparting information, teaching of skills and cultivation of values. In the present educational system, the emphasis is almost exclusively on the first of these objectives; viz. the imparting of information. The second objective, viz. the teaching of skills is partially attempted and the production skills arealmost totally neglected.....But the most important reform relates to the third objective which has

> been neglected in the past, viz. the cultivation of values. Let us realise that no education can be really value-neutral and that if we do not cultivate the right values, the wrong ones will eventually, emerge and dominate the scene. We must, therefore, now lay the highest emphasis in our educational system on the cultivation of the values appropriate to the modern democratic and socialist society."[8]

जे.पी. नाईकांच्या विचारातून हे स्पष्ट होते की, मूल्यशिक्षणाला मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. परंतु आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये आजपर्यन्त मूल्यशिक्षणाकडे दुर्लक्ष केले गेले आहे.

शिक्षण प्रक्रियेमध्ये दुर्लक्षित झालेल्या या घटकाकडे (मूल्यशिक्षण) अध्यापक, पालक, शैक्षणिक संस्था चालक व सरकार यांचे लक्ष वेधण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन उपयुक्त होईल याची खात्री वाटते.

तिसरे असे की, कोणतेही राष्ट्र म्हणजे केवळ भूभाग, जमीन, दगड, माती नव्हे, राष्ट्र म्हणजे राष्ट्रातील माणसे होत. माणसे घडून, आपल्याला राष्ट्र घडवायचे असते. कोणतेही राष्ट्र मूल्यांचा पाठपुरावा केल्याशिवाय विश्वामध्ये खंबीरपणे उभे राहू शकत नाही. क्रियाशीलता या मूल्याच्या पाठपुराव्यामुळेच अमेरिका, जपान, जर्मनी, रशिया आज जगतामध्ये ताठ मानेने जातात. मूल्यांचा पाठपुरावा हा राष्ट्रउभारणीसाठी अत्यावश्यक असतो. याची जाणीव-जागृती समाजामध्ये घडविण्याच्या दृष्टीनेही प्रस्तुत संशोधन उपयुक्त होईल याची खात्री वाटते.

यीचे असे की, मूल्य संक्रमणातील अडचणी नाहीशा करण्यासाठी अध्यापकांनी मराठीच्या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययन, अध्यापना बाबतीत कोणती सुधारणा केली पाहिजे या संदर्भात प्रस्तुत संशोधनावरील निष्कर्ष व शिफारशी उपयुक्त होतील.

'मूल्य' ही संज्ञा व्यापक आहे. पण सर्व मूल्यसंक्रमणाचा विचार येथे अभिप्रेत धरलेला नाही. केवळ इयत्ता ९ वी, १० वी च्या प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या संक्रमणाचाच विचार येथे केलेला आहे. त्यासाठी मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापना-पुरताच हा अभ्यास मर्यादित आहे.

१.४.१ संशोधनाची उद्दिष्टे :

उपरोक्त विषयाच्या संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

१) इयत्ता ९ वी व १० वीच्या माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा (मातृभाषा) मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून होणाऱ्या मूल्यांचा शोध घेणे.

२) मूल्यसंवर्धन संदर्भात इयत्ता ९ वी, १० वीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा शोध घेणे.

३) पाठांमधून व्यक्त होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यासाठी मराठीचे अध्यापक कोणते प्रयत्न करतात याचा शोध घेणे.

४) पाठात नोंद झालेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होत नसतील तर त्यामागील कारणांचा शोध घेणे.

५) ही मूल्ये अधिक चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्यासाठी कोणते प्रयत्न करावयाचे, कोणते उपक्रम हाती घ्यावयाचे या संदर्भात उपाययोजना सुचविणे.

१.४.२ <u>गृहित गोष्टी</u> :

या विषयाच्या संदर्भात खालील गोष्टी गृहित धरलेल्या आहेत.

१) मानवी जीवनात मूल्यांचे स्थान असाधारण आहे.

२) मूल्यसंस्कारामुळे माणसाला माणूसपण (माणुसकी) प्राप्त होते.

३) शिक्षण हे विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे.

४) मातृभाषेतून मूल्यसंक्रमण प्रभावीपणे होऊ शकते.

५) पौगंडावस्था ही मूल्ये संक्रमित करण्यास योग्य अवस्था आहे.

१.५ <u>संशोधनाच्या मर्यादा</u> :

या संशोधनाच्या मर्यादा खालीलप्रमाणे सांगता येतील :

१) हे संशोधन प्रथम भाषा मराठी या विषयाच्या इयत्ता ९ वी व १० वीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतीत होणाऱ्या मुल्यांच्या संदर्भातच मर्यादित आहे.

२) हे संशोधन करवीर शहर (जिल्हा कोल्हापूर) पुरतेच मर्यादित आहे.

तसेच, हे संशोधन कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांमधील इयत्ता ९ वी व १० वीच्या वर्गापुरतेच मर्यादित आहे.

हे संशोधन मराठी माध्यमांच्या शाळांपुरतेच मर्यादित आहे.

१.६ <u>संशोधन पध्दती</u> :

प्रस्तुत संशोधन हे वर्तमानकालीन अवस्थेशी निगडित असल्याने या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. वर्तमानात घडणाऱ्या मूल्यसंवर्धनाचे सर्वेक्षण पध्दतीने योग्य मूल्यमापन करता येईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे या पध्दतीच्या आधारे निवडलेल्या व पाठ्यपुस्तकांच्या परीक्षण, विश्लेषणाच्या मिळालेल्या माहितीचे संकलन, वर्णन व स्पष्टीकरण करुन त्यानुषंगाने मूल्यशिक्षणासाठी अपेक्षित असणाऱ्या बदलांसाठी योग्य त्या शिफारशी केलेल्या आहेत.

प्रस्तुत संशोधनाचे तीन भाग पडतात.

१) माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचा शोध घेणे.

२) पाठ्यपुस्तकांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये संक्रमित करताना कोणकोणत्या अडचणी येतात त्यांचे सर्वेक्षण करुन आढावा घेणे.

३) तिसऱ्या विभागात अडचणींचे निराकरण करुन निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे.

माध्यमिक स्तरावर ९ वी, १० वी ला ' मराठी ' अध्यापन करणाऱ्या अध्यापकांसाठी दिलेली प्रश्नावली (परिशिष्ट ब ) मध्ये दिली आहे.

संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आलेला आहे. ही प्रश्नावली कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांतील इयत्ता ९ वी, १० वीच्या मराठीच्या अध्यापकांना देण्यात

बनविली आहे. प्रश्नावली मूल्यशिक्षण, संवर्धन, संक्रमण तसेच इयत्ता ९ वी, १० वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतित होणाऱ्या मूल्यांच्या शोधनावर आधारीत आहे. तसेच पाठ्यपुस्तकातून प्रतित होणाऱ्या मूल्यांच्या रुजविकरणा संदर्भात मराठीचा अध्यापक कोणकोणता प्रयत्न करतात, त्यांच्या प्रयत्नामध्ये अडचणी कोणकोणत्या यावर आधारीत आहे. तसेच या प्रश्नावलीच्या आधारे मूल्यशिक्षण, पाठ्यपुस्तके, त्यामध्ये प्रतिबिंबित होणारी मूल्ये यांच्या संदर्भातील अध्यापकाचे मनोगत त्यांची मते विचार व अपेक्षा यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधकाकडून प्रश्नावलीतील मुद्यांचे निरीक्षण मुख्यतः संक्रमित मूल्यांच्या संदर्भात व त्यांच्या समस्येच्या संदर्भात केले आहे.

या प्रश्नावलीत एकूण १८ प्रश्न होते. त्यातील काही प्रश्न बंदिस्त स्वरूपाचे तर काही मुक्त स्वरूपाचे होते. काही प्रश्न संमिश्र स्वरूपाचे होते. संबंधित अध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणी क्र.१.१ मध्ये केले आहे.

<u>सारणी क्र.१.१</u>

प्रस्तुत संशोधनासाठी ९ वी, १० वीच्या मराठीच्या अध्यापकांनी भरून घ्यावयाच्या प्रश्नावलीचे विश्लेषण

| अनु. | प्रश्न क्रमांक | प्रश्नांचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १. | १ ते ६ | – | अध्यापकांची सर्वसाधारण माहिती. अध्यापकांशी पुन्हा संपर्क साधता यावा यासाठी |

सारणी क्र. १.१ (पुढे चालू...)

| अनु. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| २ | ७<br>७.अ<br>७.ब<br>७.क | बंदिस्त<br>मुक्त<br>बंदिस्त<br>मुक्त | पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात काय ? जाणीवपूर्वक संक्रमित केली जात असल्यास कशाप्रकारे केली जातात. जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नसल्यास त्या मागील कारणे कोणती हे जाणून घेणे. |
| ३ | ८ व ९ | संमिश्र | मूल्यसंक्रमणाचे प्रमाण जाणून घेणे, आणि मूल्ये संक्रमित होत नसतील तर त्यामागील कारणांचा शोध घेणे. |
| ४ | १०<br>१०.अ | बंदिस्त<br>मुक्त | अध्यापकांचे मूल्यासंबंधीत काही प्रशिक्षण झाले असल्यास ते जाणून घेणे आणि कृतीशी परिणामकारक होण्याच्या दृष्टीने अध्यापकांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे. |
| ५ | ११<br>११.अ<br>११.ब<br>११.क | बंदिस्त<br>मुक्त<br>बंदिस्त<br>मुक्त | मूल्यसंक्रमण आणि अध्यापकाचे व्यक्तिमत्व यांचा परस्पर संबंध जाणून घेणे |
| ६ | १२<br>१२.अ<br>१२.ब<br>१२.क | बंदिस्त<br>मुक्त<br>बंदिस्त<br>मुक्त | मूल्यसंक्रमण व सामाजिक वास्तव यांचा परस्पर संबंध जाणून घेणे. |

सारणी क्र.१.१ (पुढे चालू...)

| अनु. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
| --- | --- | --- | --- |
| ७ | १३ | बंदिस्त | अध्यापकांनी मूल्यसंक्रमणासाठी शाळे- |
| | १३.अ | मुक्त | मध्ये योजलेल्या उपक्रमांची नोंद घेणे |
| | १३.ब | मुक्त | आणि शाळेव्यतिरिक्त उपक्रमांची नोंद करणे. अशा उपक्रमांच्या अत्यावश्य-कतेची गरज तपासून घेणे |
| ८ | १४ | बंदिस्त | पाठ्यपुस्तकातील पाठातून प्रतिबिंबित |
| | १४.अ | मुक्त | होणाऱ्या एकूण मूल्यसंख्या |
| | १४.ब | बंदिस्त | प्रमाणाबाबत अध्यापकांचे मत |
| | १५.अ | बंदिस्त | अजमावणे व मूल्यसंख्येचा प्रमाणामुळे |
| | १५.ब | मुक्त | मूल्य संक्रमणात काही अडचणी येत असल्यास त्यांचा शोध घेणे. |
| ९ | १६ | बंदिस्त | मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करावे काय |
| | १६.अ | मुक्त | याविषयी अध्यापकांचे मत अजमावणे |
| | १६.ब | मुक्त | व मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन कसे करता |
| | १७ | बंदिस्त | येईल याचा शोध घेणे. |
| १० | १८ | मुक्त | प्रस्तुत संशोधनास उपयुक्त माहिती आणून घेणे |

प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण करून विश्लेषण, वर्गीकरणाच्या योग्य मांडणीतून वस्तुस्थितीची स्पष्ट कल्पना आणलेली आहे. वस्तुस्थितीचा साकल्याने विचार करून पाठ्य-पुस्तकाच्या अध्यापनातून मूल्यसंवर्धन या संदर्भात वस्तुस्थितीचे स्वरूप ज्ञात घेतले गेले आहे. वस्तुस्थितीच्या स्वरूपाचे निरीक्षण व परीक्षण करून

निष्कर्ष काढले गेले आहेत. औपचारिक अभ्यासाठी मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले गेले आहेत. या निष्कर्षांचा संघटितरीत्या सूक्ष्मरीतीने विचार करून समस्येच्या संदर्भात कोणती उपाययोजना करता येईल याबाबतीत शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

प्रश्नावलीद्वारा मिळालेली माहिती पडताळण्यासाठी व तिची यथार्थता व विश्वसनियता अजमावण्यासाठी संशोधकाने माध्यमिक स्तरावर मराठी अध्यापन करणाऱ्या काही शिक्षकांच्या अनौपचारिक मुलाखती घेतलेल्या आहेत व काही पाठांचे निरीक्षण देखील केले आहे.

१.७ प्रकरणीकरण :

संशोधनामध्ये वापरलेली पध्दती तसेच प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण व पृथःकरण करून त्यांचे परीक्षणात्मक अन्वयार्थ काढून व त्या अनुरोधाने काढलेले निष्कर्ष, शिफारशी पुढील प्रकरणात नोंदविल्या प्रमाणे मांडलेल्या आहेत.

प्रकरण-१ : विषय प्रवेश

या प्रकरणामध्ये ही समस्या कशी निर्माण झाली याचा शोध घेऊन समस्येचे शब्दांकन केले आहे. तसेच समस्येचे महत्त्व, गरज, समस्येच्या मर्यादा, उद्दिष्टे आणि या समस्येसाठी कोणती संशोधन पध्दती उपयोजिण्यात आली याचा निर्देश करण्यात आला आहे.

प्रकरण-२ : मूल्य - अर्थ, महत्त्व व अध्यापन

प्रस्तुत प्रकरणात मूल्य म्हणजे काय ? त्याचे मानवी जीवनातील स्थान, मूल्यांचे संक्रमण म्हणजे काय ? ती ज्ञानात्मक, क्रियात्मक म्हणजे काय करायचे ? मूल्य शिकण्यामध्ये शिक्षण आणि शिक्षकाची भूमिका

कोणती ? इत्यादी गोष्टींचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

<u>प्रकरण-३</u> : <u>समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन</u> :

समस्येशी निगडित ग्रंथ व लेख यांचे प्रकाशित व संशोधित साहित्याचे समालोचन या प्रकरणात केले आहे.

<u>प्रकरण-४</u> : <u>इयत्ता ९ वी, १० वीच्या 'कुमारभारती' या पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे विश्लेषण :</u>

या प्रकरणामध्ये इयत्ता ९ वी, १० वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांतून प्रतीत होणाऱ्या मूल्यांचा शोध घेऊन ती निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच त्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

<u>प्रकरण-५</u> : <u>संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन :</u>

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रश्नावलीद्वारे गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण विश्लेषण करून या विश्लेषणावर आधारित अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे.

<u>प्रकरण-६</u> : <u>निष्कर्ष आणि शिफारसी</u> :

संशोधन सामग्रीच्या आधारे समस्येच्या वस्तुस्थितीचे निश्चितीकरण करण्यात आलेले आहे. त्यातून निष्कर्ष काढलेले आहेत. काढलेल्या निष्कर्षांच्या आधारे शिफारसींचा निर्देश करण्यात आलेला आहे व निश्चित अशी उपाययोजना सुचविण्यात आलेली आहे. तसेच प्रस्तुत संशोधन विषयाशी प्रत्यक्षपणे निगडित नसलेल्या तथापि प्रस्तुत समस्येचे सम्यक् आकलन होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश करण्यात आलेला आहे.

## संदर्भ सूची


१) नागपुरे व.रा. संयोजक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे : शिक्षक मार्गदर्शक व्यापक कार्यक्रम, मे-जून, १९८७ - अध्ययन घटक - घटक सामान्य अ.नं. ३५ ए.डी.१ - नैतिक शिक्षण निर्मिती, पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

2) Educational Reconstruction (A Collection of Gandhiji's Articles on the Wardha Plan and the Reports), p.4 as quoted in 'Wardha Scheme', K.L. Shrimali, Vidya Bhawan Society, Udaypur, 1949.

3) National Policy on Education, 1986, Part-III, Paras 8.4, 8.5, 8.6, Delhi : Government of India, Ministry of Education.

4) G. Terry Page and J.B. Thomas with A.R. Marshall, International Dictionary of Education, 1979, London : The English Language Book Society and Kogan Page.

5) G. Terry Page and J.B. Thomas with A.R. Marshall, International Dictionary of Education, 1979. London : The English Language Book Society and Kogan Page.

6) International Dictionary of Education, G. Terry Page and J.B. Thomas with A.R. Marshall) (London : The English Language Book Society and Kogan Page, 1979).

७) ग.वि. अकोलकर, ना.वि. पाटणकर, मराठीचे अध्यापन, सातवी आवृत्ती, पृ. ४, १९७०, पुणे : व्हीनस प्रकाशन.

8) J.P. Naik, Policy and Performance in Indian Education 1947-74. as quoted in " विद्यार्थी निर्मिती ", डॉ.रा.मा. पेडस्कर, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, १९८१, पृ. १४.